# वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे

जिमखाना विभाग

वार्षिक अहवाल

(२००९-१०)

---

- **ठाणे मॅरेथॉन, (ठाणे) :** राष्ट्रीय स्तरावर संपन्न होणा-या ठाणे मॅरेथॉन स्पर्धेत दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- **चॅम्पियन रिले मॅरेथॉन, (रत्नागिरी)** : रत्नागिरी ते गणपतीपुळे दरम्यान आर्यन स्पोर्टस क्लब व यश फाऊंडेशन यांच्यातर्फे आयोजित स्पर्धेत सांघीक गटात **तृतीय** क्रमांक मिळवून प्रत्येकी कास्यपदक, एकूण सहा रौप्य पदके, रोख रू. २००० व प्रमाणपत्र तसेच चषक मिळविले.

- **जिल्हास्तरीय भव्य मॅरेथॉन, (देवरूख)** : आकार आर्गनायझेशनतर्फे क्रांती दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत कु. विशाल विश्वास साळूंके याने **तिसरा** क्रमांक पटकावला. त्याला चषक, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक मिळाले.

- **आंतर -महाविद्यालयीन क्रॉस कंट्री, (शिवळे)** : २९ ऑगस्ट २००९ रोजी कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन क्रॉस -कंट्री स्पर्धेत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला होता. मुलांच्या संघाने सांघीक गटात **चौथा** तर मुलींच्या संघाने सांघिक गटात **दुसरा** क्रमांक पटकावला. कु. दिपाली गावडे हिची केरळ येथे होणा-या आंतर -विद्यापिठ स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात निवड झाली.

- **राज्यस्तर कराटे स्पर्धा, (अहमदनगर) :** १६ ते १९ सप्टेंबर दरम्यान २३ वी महाराष्ट्र राज्य किक बॉक्सींग स्पर्धेत महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यात साळवी कल्पना मदन हिने **रौप्य** पदक, पवार सुशील सुधिर याने **सुवर्णपदक** तर रहाटे कृष्णा किशोर याने **रौप्य** पदक पटकावले.

- **आंतरवर्गीय कॅरम स्पर्धा, (पाटपन्हाळे)** : महाविद्यालयामध्ये २० ते २१ आक्टोंबर २००९ रोजी महाविद्यालयीन स्तरावर कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण ३२ स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेती विजेते व उपविजेते यांना मुंबई विद्यापिठाच्या आंतर महाविद्यालयीन कॅरम स्पर्धेत सहभाग देण्यात आला होता.

- **राष्ट्रीय स्तर किक बॉक्सींग स्पर्धा, भुवनेश्वर, (ओरिसा) :** दि. ०१ ते ०४ ऑक्टोबर २००९ रोजी भुवनेश्वर येथे संपन्न झालेल्या १५ वी राष्ट्रीय स्तर किक बॉक्सींग स्पर्धेत महाविद्यालयातील कु. साळवी कल्पना मदन , कु. पवार सुशील सुधीर, कु. रहाटे कृष्णा मदन यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये कु. रहाटे कृष्णा मदन याने **कास्यपदक** पटकावले.

- **आंतर -महाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धा, (मुबई)**: दि. १३ ते १५ नोव्हेंबर २००९ रोजी विद्यापिठ क्रिडा संकूल, मुंबई येथे संपन्न झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत धावणे, थाळी फेक, गोळा फेक इ. प्रकार होते. यात महाविद्यालयाच्या ०६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

- **राज्य स्तरीय कराटे स्पर्धा, (मुबई)** : दि. १९ ते २० डिंसेबर २००९ दरम्यान कु. सुशील सुधिर पवार याने अंधेरी, मुंबई येथे संपन्न झालेल्या २३ व्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत **कास्यपदक** मिळवले.

- **वार्षिक क्रिडा स्पर्धा** : दि. ०१ ते ०३ जानेवारी २०१० मध्ये महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहाने घेण्यात आल्या. कबड्डी, खो-खो, क्रिकेट या सांघिक स्पर्धांमध्ये सर्वच वर्गांनी सहभाग नोंदविला. धावणे, कॅरम, थाळीफेक, गोळाफेक या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. याच वेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आंतर -महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा घेतल्या. त्यात महाविद्यालयाने **प्रथक** क्रमांक पटकावला.
- **आंतर -महाविद्यालयीन अर्ध मॅरेथॉन स्पर्धा, (गोवेली)** : २५ जानेवारी २००९ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय गोवेली, ता. कल्याण जि. ठाणे येथे संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयातील अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

- **रायगड चढणे व उतरणे** : दि. ०६ मार्च २०१० रोजी रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर -महाविद्यालयीन रायगड चढणे व उतरणे या स्पर्धेत महाविद्यालयाचा प्रथमच सहभाग होता. या स्पर्धेत मुलांच्या गटात ०७ व मुलींच्या गटात ०६ विद्यार्थीनींचा सहभाग होता. दोन्ही गटांमध्ये महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला. याबदल १३ विद्यार्थ्यांना प्रत्येकी **रौप्यपदक** मिळाले. या बदद्ल प्रत्येक विद्यार्थ्यांना विद्यापिठाकडून **१० ग्रेस मार्क्स** मिळाले.

२००९-१० या वर्षात आंतर -महाविद्यालयीन स्तरावर १९ पदके, राज्यस्तरावर ३, राष्ट्रीय स्तरावर ०१ व जिल्हास्तरावर ०४ पदक मिळवून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकीकात मोलाची भर घातली.